# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२२१ दिनांक-०९/०६/२०२४

**विरार पोलीस ठाणे हद्दीतील गावठण विरार रेल्वे स्टेशन जवळ पैशे लावुन जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या १७ पुरुष आरोपीत यांचेवर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश**

विरार पोलीस ठाण्याचे हद्दीत **रा.रुम नं.०२ पद्मा कॉलनी,विरार गावठाण,विरार बस डेपो समोर एचडीएफसी बॅकेच्या पाठीमागे, विरार पश्चिम ता.वसई जि.पालघर**,याठिकाणी पैसे लावुन जुगार खेळला व खेळविला जात असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाली असता सदर वेळी दोन लायक पंच यांना कार्यालयात बोलावुन घेवुन विरार गावठण येथे जावुन कारवाई करण्याच्या सुचना देवून सदर बातमीची खातरजमा करुन पंच व पोलीस पथक असे जावून दि.०७/०६/२०२४ रोजी कारवाई करुन **गावठाण विरार ता.वसई जि.पालघर**,येथील पैसे लावुन जुगार खेळला व खेळविला जात असलेले १७ पुरुष यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, **पद्मा कॉलनी, विरार गावठाण ता.वसई जि.पालघर,** सदर परीसरामध्ये अनधिकृतपणे पैसे लावुन जुगार खेळला व खेळविला जात असल्याची मिळालेल्या माहीतीच्या आधारे गावठाण विरार येथे जावुन पंच व पथक असे खेळत असलेल्या ठिकाणी जावुन छापा टाकला असता जुगार खेळविणाऱ्या जागेचा मालक **विक्रम काशिनाथ मांगेला वय ३२ वर्षे रा.टेंबीपाडा ,साईराम बंगला,आगाशी विरार (पश्चिम) ता.वसई जि.पालघर** याचेसह तेथे काम करणारे ८ पुरुष आरोपी व जुगार खेळण्याकरीता आलेले ८ पुरुष असे एकुण १७ पुरुष आरोपीतांना ताब्यात घेवुन विरार पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक व स्टाफ यांचेसह संयुक्त कारवाई करुन आरोपीतांविरुध्द विरार पोलीस ठाणे गु.रजि.न-४०५/२०२४ महाराष्ट्र जुगार अधिनियम ४,५ सह भा.दं.वि.सं.कलम १८८,३४ सह मो.वा.का.कलम २८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व पोहवा/०५०२८ किणी,पोहवा/०७०५५ शेटये,पोहवा/१०००२ शिंदे, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोशि/१६०९५ पाटील, चालक पोहवा/०७०६६ पागी,सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा विभाग तसेच विरार पोलीस ठाणे येथील पोहवा/०६००८ लोखंडे,पोहवा/०७०७७ गावित,पोशि/१००२८ शेळके,पोशि/१३१२८ सातपुते,पोशि/१७०७१ शिंदे,पोशि/१६०१९ पवार यांचेसह उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

**----0000----**